# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२५/०६/२०१८

## दि.२४/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २१४/१८,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | प्रेमांशु माईती,वय-३८ वर्षे,रा.११५३,रविवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसमापैकी १.एक इसम,रंगाने गोरा,अंगाने मध्यम,चेहरा उभट,नाक सरळ, डोकीचे केस मागे फिरवलेले, अंगात पांढ-या रंगाचा टी शर्ट, २.दुसरा इसम उंच,रंगाने सावळा,चेहरा उभट,वय अंदाजे ४५ वर्षे,अंगात फिकट निळया रंगाचा शर्ट,गळयात काळया रंगाची छोटी बॅग अडकवलेली |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०१८ रोजी १३/०० ते १३/३० वा.चे दरम्यान बागवान मस्जीद रविवार पेठ ते खडके गुडदाणी गणेश पेठ,पुणे या दुकानाचे जवळ महाराण प्रताप रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे १२,५४,४००/- रु किंमतीचे सोन्याचे दागिने असलेली पिशवी पॉलीश करण्यासाठी घेऊन जात असताना,यातील नमुद वर्णनाचे इसमांनी नमुद ठिकाणी येवुन फिर्यादी यांना "मै तुम्हारा प्रॉब्लेम निकालता हुँ,तुम तुम्हारे भगवानका नाम लो" असे म्हणुन प्रसाद घेण्याचे बहाण्याने फिर्यादी यांचेकडील नमुद सोन्याचे दागिने असलेली पिशवी घेऊन त्यांना पंचवीस पाऊले पुढे जाण्यास सांगुन,हातचलाखी करून सदर दागिन्यांचा ऐवज असलेली पिशवी फसवणुक करून घेऊन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संजय गायकवाड ९८२३९३८५५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २६९/१८,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | सती मधुमल,वय-६२ वर्षे,रा.सानेवाडी,औंध,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बँक खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुन २०१६ ते दि.२४/६/२०१८ रोजीचे कालावधीत सानेवाडी,औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईल व बँक खातेधारक यांनी फिर्यादी यांचे लॅन्डलाईन नंबरवर तसेच व्हॉटअप नंबरवर संपर्क साधुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांना मोठया आर्थिक परताव्याचे, पेन्शन प्लॅनचे, इन्श्युरन्स प्लॅनचे, महिला आरक्षण स्कीमचे प्रलोभन देवुन ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स, स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँकेचे वेग-वेगळया खात्यावर तसेच आयसीआयसीआय बँक खात्यामध्ये वेळोवेळी पैसे भरण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची एकुण २०,००,०००/- रूपयेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, संजय ठेंगे ८४८३०३८९५३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ५४/१८,भादविक ४०६,५०४,३४ |
| **फिर्यादी** | गौतम मैदकर,वय-५७ वर्षे,रा.शिवणे,पुणे |
| **आरोपी** | परिवर्तन अर्बन मल्टीस्टेट कॉ.ऑप.क्रेडीट सोसायटी लिमी.पतसंस्थेचे १.चेअरमन २.संचालक ३.मॅनेजर असे एकुण १४ मंडळ |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे फेब्रुवारी २०१८ ते आजपर्यंत परिवर्तन अर्बन मल्टीस्टेट कॉ.ऑप.क्रेडीट सोसायटी लिमी. पतसंस्था |

**तपशिल** यातील नमुद १.चेअरमन २.संचालक ३.मॅनेजर असे एकुण १४ इसम व महिला यांनी फिर्यादी व त्यांचे पत्नीस परिवर्तन अर्बन मल्टीस्टेट कॉ.ऑप.क्रेडीट सोसायटी लिमी.पतसंस्थे मध्ये पतसंस्थेकडुन ज्यादा व्याज दिले जाते असे अमिष दाखवुन,तसेच आमची खुप जुनी पत संस्था आहे. आमच्या पतसंस्थेच्या सगळीकडे शाखा आहेत असे सांगुन फिर्यादी व त्यांची पत्नी यांचा विश्वास संपादन करून,त्यांचेकडुन वेळोवेळी २५ लाख रूपये रकमेच्या मुदत ठेवी स्वीकारल्यानंतर फक्त पाच ते सहा महीन्याचे ठेवीवरचे व्याज देवुन,त्यानंतर ठेवीवरील व्याज व मुद्दलही न देता,सदरची पतसंस्था ही परस्पर बंद करुन फरार होवुन,फोनवर पतसंस्था बंद झाली असुन,पतसंस्थेचे संचालक फरार झाले आहेत,त्यामुळे मी तुम्हाला पैसे देवु शकत नाही,तुम्हाला कोणत्या पोलीस स्टेशनला तक्रार द्यायची असेल तर द्या असे सांगुन फोन बंद करुन,पतसंस्थेचे मॅनेजर, चेअरमन व संचालक मंडळ यांनी संगनमताने फिर्यादी व त्यांची पत्नी यांची २५ लाख रुपयेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. बी.बी.पिंगळे ९८८१३८९१७८

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे ७४७/१८,भादविक ३७९,४२७ व भारतीय वन अधिनियम कलम २६ फ ४१ अ,४२ व महाराष्ट्र वृक्ष तोड अधिनियम ३,४ प्रमाणे

**फिर्यादी** दत्तात्रय नलगे,वय-३३,रा.माळवाडी,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२३/०६/२०१८ रोजी २१/४५ वा.ते दि.२४/०६/२०१८ रोजी सकाळी ०५/३० वा. चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरा समोरील अंगणातुन माळवाडी स.नं.१६५,दिलीप तुपे माजी नगर सेवक यांचे घरा शेजारी माळवाडी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे घरासमोरील पटांगणात असणारे चंदनाचे झाड,कोणीतरी अज्ञात इसमाने अंदाजे १५,०००/- रु किंचे चंदनाचे झाड कशाचे तरी सहायाने कापुन चोरुन नेले आहे.

**त.अंमलदार** पो.हवा. चवरकर ९९२३४७५८९८

## दि.२५/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** दत्तवाडी पो स्टे २५०/१८,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,३२३,महा.पो.का.क. ३७(१)१३५, आर्म ॲक्ट ३(२५),क्रीमी.लॉ.अमेंडमेंट ॲक्ट ३ व ७

**फिर्यादी** मयुर भगरे,वय-२१,रा.दत्तवाडी,पुणे

**आरोपी** एकुण २० ते २५ साथीदार (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२४/०६/२०१८ रोजी रात्रौ १२/०० वा. दत्तवाडी दर्गा,शंकर मंदिरा जवळ दत्तवाडी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे साथीदारासह श्रीकृष्ण मंडळ,दत्तवाडी,पुणे येथे रोडवर बोलत उभे असताना,रोहित उटाडा याचा वाढदिवस त्याचे मित्र रोडवर साजरा करीत होते. त्यावेळी अक्षय मारणे उर्फ मट्टा याने फिर्यादी यांचेकडे पाहण्याचे कारणावरून इतर साथीदारांना बोलावुन फिर्यादीस लाथा-बुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून,रोहित उटाडा याने एकाला जिवंत सोडत नाही असे म्हणुन फिर्यादी यांचे दिशेने फायरींग केल्यामुळे फिर्यादी यांचे मित्र सुरज भालचंद्र यशवद,वय-३०,रा.राजेंद्रनगर,पुणे याचे कमरेचे खाली डावे बाजुस गोळी लागुन तो गंभीर जखमी होवुन,त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न करून,सदर भागात दहशत निर्माण केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. राऊळ ९९६०५८५९४९

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २५१/१८,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,३२३,२२९,३३६,१०९,महा.पो. का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रीमी.लॉ.अमेंडमेंट ॲक्ट ३ व ७ |
| **फिर्यादी** | वैभव रोकडे,वय-२१,रा.भेकराईनगर,फुरसुंगी गांव,पुणे |
| **आरोपी** | एकुण १० ते १२ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०१८ रोजी १२/०० वा. श्रीकृष्ण मित्र मंडळा शेजारी दत्तवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे साथीदारासह श्रीकृष्ण मंडळ,दत्तवाडी,पुणे येथे रोहित उटाडा याचा वाढदिवस साजरा करीत असताना,झेड एल.ग्रुपचे इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवुन, फिर्यादी यांना जीवे मारण्याचे उद्देशाने त्यांचे अंगावर भरधाव वेगाने दुचाकी गाडया घालुन, दगड व लाकडी बांबुने मारून,लोखंडी कायते घेवुन आल्यानंतर,फिर्यादी हे भितीने लपुन बसलेल्या घराचे दारावर त्यांनी दगडाने व लाथांनी मारून फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. साळवे ७५८८१७५१८८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १०८/१८,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-७३,रा.एरंडवणा,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१८ रोजी सकाळी ०६/३० वा. कमला नेहरू पार्ककडुन पीवायसी जीम खान्याकडे जाणारे गल्लीतील नवरत्न अपार्ट. समोरील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह सकाळी प्रभात फेरी मारण्यासाठी जात असताना,नमुद इसमाने दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ४५ हजार रू किची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कोळंबीकर ९४०४९०११११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**